# बृहन्मुंबई महानगरपालिका

घकव्य, जी/दक्षिण, ना. म. जोशी मार्ग, प्रभादेवी, मुंबई - 400013.

क्र. स.अ.(घ.क.व्य.)जी.द./ 1143 /एस.आर. दिनांक 20/10/2022

## "स्वारस्य अभिव्यक्ती" (E.O.I.)
## सेवाभावी संस्थांमार्फत कामगार पुरवठा करण्यासंबंधी सूचना

सदर सूचनेव्दारे जी/दक्षिण विभागातील सर्व नोंदणीकृत सेवाभावी संस्थांना कळविण्यात येत आहे की, "दिवाळी" सणा दरम्यान **"शुभ दिपावली स्वच्छ दिपावली"** या अभियाना अंतर्गत जी/दक्षिण विभागातील सार्वजनिक शौचालयांची विशेष साफसफाई करण्याकरीता मागणीनुसार कामगार पुरविण्यासाठी खालील अटी व शर्तीनुसार विभागातील ईच्छुक स्थानिक नोंदणीकृत सेवाभावी संस्थांनी सहाय्यक अभियंता (घकव्य) जी/दक्षिण विभाग, दुसरा मजला, जी/दक्षिण विभाग कार्यालय, ना. म. जोशी मार्ग, धनमिल नाका, मुंबई -400 013 यांच्या नावे नोंदणी प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती सहीत दि. 22/10/2022 रोजी दु.1.00 वाजेपर्यंत अर्ज करावेत. सदर तारखे नंतर प्राप्त अर्जांचा विचार केला जाणार नाही.

अटी व शर्ती :-

1. जी/दक्षिण विभागातील नोंदणीकृत असलेल्या संस्थांनीच त्यांच्या बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये नोंदणी असलेल्या वेंडर कोड व ई-मेल आय-डी सहीत विषयांकीत काम मिळण्याकरीता अर्ज करावेत.
2. सदर संस्थेकडे कंत्राटी कामगार परवाना नोंदणी क्रमांक, भविष्य निर्वाह निधी नोंदणी क्रमांक व कामगार विमा योजना नोंदणी क्रमांक असणे बंधनकारक आहे व अशाच संस्थांनी विषयांकीत कामाकरीता अर्ज करावेत.
3. विषयांकीत स्वरुपाच्या कामाचे वाटप पात्र ठरलेल्या संस्थांमधून सोडत प्रक्रियेव्दारे दोन संस्थांमध्ये करण्यात येईल.
4. आठ तासांच्या दुपार पाळीमध्ये आवश्यकते व सूचनेनुसार जी/दक्षिण विभागात कामगारांचा पुरवठा करणे नियुक्त संस्थेस बंधनकारक राहील.
5. संस्थांनी नेमून दिलेल्या ठिकाणी आवश्यक कामगारांचा पुरवठा करुन संबंधित कनिष्ठ अवेक्षक यांना दैनंदिन कामाचा अहवाल छायाचित्रासहीत (timestamp app व्दारे) देणे बंधनकारक राहील.
6. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सद्य प्रचलित किमान वेतन धोरणानुसार वेतनाचे अधिदान रु.698.07 प्रतिदिन / प्रति कामगार अधिक (+) 49.58% लेव्हीचे अधिदान या दराने राहील.
7. कामासाठी लागणारे आवश्यक साहित्य, अवजारे तसेच कामगारांस आवश्यक सुरक्षा उपकरणे/साधने पुरविण्यास संस्था बंधनकारक राहील.
8. विषयांकीत कामाकरीता नियुक्त केलेल्या संस्थांकडून सुरक्षा अनामत रक्कम रु.5000/- (refundable) घेण्यात येईल व काम समाधानकारकरित्या पुर्ण केल्यानंतर सदर अनामत रक्कम त्या संस्थेस परत करण्यात येईल.
9. अयोग्य अर्ज कोणताही पत्र व्यवहार न करता फेटाळण्याचे तसेच विषयांकीत कामाचा कालावधी तथा मनुष्यबळाची संख्या ही परिस्थितीनुसार कमी-अधिक करण्याचा तथा सदर कामास स्थगिती देण्याचा अधिकार मा. सहाय्यक आयुक्त जी/दक्षिण विभाग ह्यांचे राहतील.

सही/-

**सहाय्यक अभियंता (घकव्य) जी/दक्षिण**